करून ट्रन्सव्हाल प्रांतात प्रवेश करणाऱ्यांनी ३ पौंड कर भरावा असा कायदा केला. गोरेत्तर लोकांचे राजकीय अधिकार हिरावून घेण्यात आले.

गांधीजी द. आफ्रिकेत गेले व तेथे त्यांनी भारतीयांना स्वत:च्या हक्काची, जाणीव करून दिली. दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रह चळवळ या आपल्या पुस्तकात त्यांनी विस्तृत माहिती दिलेली आढळते. गोखले यांनी दक्षिण आफ्रिकेला भेट द्यावी व भारतीय लोकांचे दु:ख स्वत:पहावे अशी विनंती गांधीजींनी गोखलेंना केली. इ.स. १९११ साली गोखलेंनी गांधीजींचे निमंत्रण स्वीकारले. भारतमंत्र्याचा सल्ला घेऊन त्यांनी गांधीजींना आपण येण्यची सूचना दिली. द. आफ्रिकन सरकानेही या भेटीचे स्वागत केले. इ.स. १९१२ सालच्या २२ ऑक्टोबरला गोखले केपटाऊनला पोहोचले. यावेळी गोखलेंचे भव्यरित्या स्वागत झाले. तेथून ते जोहन्सबर्ग येथे गेले. त्यावेळी सत्याग्रह चळवळीचे ते केंद्रस्थान होते. सर्वसामान्य नागरिकांसाठी शहरात एक सार्वजनिक सभा घेण्यात आली. त्यात गोखले भाषण करणारे होते. जोहन्सबर्ग पासून सांजीबारपर्यंत झालेल्या दौऱ्यात गोखल्यांनी मराठीत भाषण केले व गांधीजींनी त्यांचे भारतीय रुपांतर केले. युनियन सरकारचे पाहूण म्हणून गोखल्यांना नाताळहून प्रिटोरिया येथे जायचे होते. तेथे जनरल स्मटम् व जनरल बोथा या दोघांशीही राजकीय वाटाघाटी करावयाच्या होत्या. गोखले यांनी शक्य तितकी माहिती मिळवून चार वसाहतीतील भारतीयांचे प्रश्नाबद्दल चर्चा करण्याचे ठरले. वरील दोन जनरलस् बरोबर दोन तास चर्चा झाली. चर्चेत निश्चित अशा अटी ठरल्या नाहीत. याकाळात गोखलेंनी गांधीजींना भारताच्या राजकीय परिस्थितीचे पृथ्वकरण करून सांगितले. भारतातील सर्व देशी पुढाऱ्यांच्या स्वभावाची व तत्त्वांची कल्पना त्यांनी गांधींना दिली. गोखले नेहमी भारताचे दारिद्रय व दास्य यांचा विचार करीत. त्यांनी राजकारणाला अध्ययात्मिकतेचा पाया दिला होता. त्यामुळे गांधीवर त्यांचा जास्त प्रभाव पडला. गांधीजी गोखल्यांना महात्मा म्हणत. पुढे गोखल्यांनी १३ फेब्रुवारी १९१५ रोजी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीत गांधीजींचे स्वागत केले.

- **छत्रपती शाहू महाराज ( जन्म २६ जुलै १८७४ , मृत्यू ६ मे १९२२):-** छत्रपतीपदावर आरुढ झाल्यानंतर शाहू महाराजांच्या हातून लोककल्याणाची जी पहिली कृती घडली ती म्हणजे कोल्हापूर शहरापासून मिरजेपर्यंत आगगाडीचा रस्ता करण्याची. शाहू माहाराजांनी पत्रके काढून वेठबिगार पध्दत बंद करून त्यांचे पुनर्वसन करण्यास मदतही केली. शाहू महाराजांना सतत कार्यतर रहाण्यास आवडे. त्यांची वेशभूषा राजघराण्यातील अभिव्यक्तीची असूनही रहाणीमान अतिशय साधे असे.

- **दुष्काळ व प्लेग यांस केलेला प्रतिबंध :-** शाहू महाराजांनी राज्यसूत्रे हाती घेतल्यानंतर दोन वर्षांनी महाराष्ट्रात ( इ.स. १८९६ मध्ये) खूप मोठा दुष्काळ पडला.

Scanned with OKEN Scanner

**३. छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य** :- छत्रपती शाहू महाराजांच्या एकूण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. महात्मा फुले यांच्याप्रमाणे सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. शाहु महाराजांनी अधिकारग्रहण केले त्यावेळी बहुजन समाजात मॅट्रिक उत्तीर्ण झालेल्यांची संख्या अल्प होती. खेड्यामधून प्राथमिक शाळा नव्हत्या. सर्व सामान्य बहुजन समाजाच अज्ञानाचे व अंधश्रध्देचे जीवन जगत होता. शिक्षण घेणे हे ब्राम्हण किंवा श्रीमत सावकाराचे काम आहे, आपले काम नाही अशी या समाजाची समजूत होती. ज्ञानाच्या क्षेत्रात ब्राम्हण जातीची मक्तेदारी ब्रिटिश काळापासून निर्माण झालेली होती. इंग्रजांनी विद्येची प्रवेशव्दारे सर्व जातींसाठी खुली केली. तथापि, पूर्वीपासून ज्यांना विद्याभ्यासाची परपरा नव्हती त्यांना या नव्या संधीचा लाभ घेता आला नाही. बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दारिद्रयाचे जीवन जगत होते. छत्रपती शाहू महारजाांनी या अज्ञानी बहुजन समाजात ज्ञानाची ज्योत प्रज्वलीत करण्याचा निश्चय केला. बहुजन समाजाला., स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत सोय उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले. बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करण्याचे त्यांनी ठरविले. शिक्षण हाच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानाच्या सागरात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे- अशी छत्रपती शाहू महाराजांची विचारसरणी होती.

इ.स.१९१३ मध्ये शाहू महाराजांनी प्रत्येक गावात निदान एक तरी शाळा असावी व ती शाळा गावात बहुसंख्येने राहणाऱ्या जातीच्या व्यक्तीने चालवावी असे त्याचे मत असल्याने, शिक्षकाचा गावकामगारांत समावेश करून वतनाने भाडेमुक्त जमीन देण्याचे ठरविले. शिक्षणाविषयी शिक्षकाच्या मनात आस्था निर्माण व्हावी व त्याने शिक्षण विषयक चळवळीला गती यावी असे महाराजांना वाटत होते. तथापि शिक्षकांच्या बाबतीत वतनदारी पध्दत उपयुक्त न ठरल्याने त्यांनी शिक्षकांची पगारावर नेमणूक सुरु केली. इ.स.१९१३ च्या आदेशानुसार निरनिराळ्या खेड्यांमध्ये मंदिरे, चावडी, धर्मशाळा या इमारतींमधून प्राथमिक शाळा सुरु केल्या. शाळेच्या इमारतींचे बांधकाम, दुरुस्ती व देखरेख ही कामे पाटील. कुलकर्णी व प्रजाजनांवर सोपविली. शिक्षणाच्या कार्यात समाजाचा सहभाग मिळविण्याची त्यांनी योजना केलेली दिसते. बहुजन समाजाच्या सर्वांगीण हितासाठी प्राथमिक शिक्षणाच्याव्दोर छत्रपती शाहू महाराज व्यापक बैठक तयार करीत होते. त्या दृष्टीकोनातूनच त्यांनी निरनिराळ्या शिक्षणसंस्था व व्यक्तींना आर्थिक सहकार्य केले. त्यामुळेच कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षणाचा विकास झाला २५ जुलै १९१७ च्या

Scanned with OKEN Scanner

शिक्षणाच्या प्रसाराला विस्तृत स्वरुप प्राप्त झाले. या धोरणाचा इतका फायदा झाला की इ.स. १९१७ ते१८ साली शाळांची संख्या २७ व विद्यार्थ्यांची संख्या १,२९६ होती ती इ.स.१९२१ व २२ मध्ये ४२० शाळा व २२,००७ विद्यार्थी इतकी वाढलेली दिसते. छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रातील या धोरनांचा स्वीका करताना त्यावर सर्वकष विचार केलेला होता. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीच्या योजनेत शाळांची निर्मिती, देखभाल, उत्पन्न, खर्च,शिक्षकांची नेमणूक इत्यादी व्यवस्थेच्या बाबतीत त्यांनी स्पष्ट नियम घालून दिलेले होते. प्राथमिक शाळांच्या वाढत्या संख्येबरोबरच शिक्षकही वाढणार याची जाणीव ठेवून जून १९१८ पासून शिक्षकांची परीक्षा घेण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यासाठी शिक्षकी पेशास आवश्यक असलेला चांगल्या वर्तणुकीचा दाखला व पंचवीसच्या आतील वय ही अट घातली. या योजनेचा प्रचंड खर्च चालविण्यासाठी इ.स. १९१८ मध्ये शिक्षणविषयक कराचा कायदा केला. दरमहा शंभर रुपयापेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या व्यक्तींवर हा शिक्षणकर बसविला तर लहान मोठ्या गावांतून घरटी आठ आणे व एक रुपया शिक्षणकर वसूल करण्यात सुरुवात केली. शिक्षणावर शासनाच्या होणाऱ्या अमाप खर्चावरून महाराजंची प्रखर ध्येयनिष्ठा दिसते. इ.स.१९१८ मध्ये त्यांनी अस्पृश्यासांठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद पाडल्या व अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळेतून दाखल करून घ्यावे असे धोरण जाहीर केले.

**४. स्त्री शिक्षण :-** बहुजन समाजाप्रमाणेच स्त्रीजीवनाच्या मागासलेपणाची शाहू महाराजांना जाणीव होती. राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत महाराजांनी जाहीर केलेली होती. आपल्या सुनबाई इंदुमती राणीसाहेब यांना वैधाव्य प्राप्त झाल्यांनतर त्यांना शिक्षण देऊन कोल्हापूर संस्थानाचे शिक्षण खाते त्यांच्याकडे सोपविण्याचा महाराजांचा विचार होता. तथापि राहणीसाहेबांच्या मृत्युमुळे तो पूर्ण झाला नाही. संस्थानच्या शिक्षणाधिकारी म्हणून मिस लिट्‌डनंतर त्यांनी रखमाबाई केळकवकर यांची नेमणूक केली. यावरून महाराजांचा स्त्रीशिक्षणविषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो. स्त्रीशिक्षणामुळे कुटुंबाचा, समाजाचा अप्रत्यक्षपणे विकास घडून येतो, स्त्रीला कुटुंबात व समाजात आदाराचे व मानाचे स्थान मिळणे शक्य होते असा त्यांचा विश्वास होता.

**५. उच्च व व्यवसाय शिक्षण :-** प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच छत्रपती शाहू महाराजांनी माध्यमिक व उच्च शिक्षणालाही महत्त्व दिले. सन.१८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरु झालेल्या एका इंग्रजी शाळेचे सन.१८८१ साली राजाराम महाविद्यालयात रुपांतर झाले. जहागिरदार व सरदाराकडून मिळणाऱ्या वर्षासनातून या महाविद्यालयाचा ,खर्च चाले. वर्षासने

आर्यसमाजाकडे सोपविले.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाप्रमाणेच शाहू महाराजांनी व्यावसायिक शिक्षणालाही महात्त्व दिले ग्रामाचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यसाठी महाराजंनी पाटील स्कूल व तलाठी स्कूल सुरु केले. या शाळांमूधन पाटील व तलाठ्यांना सर्वसाधारण जमाखर्च, कायदे, शांतता व सुव्यवस्था, महसूलविषक दक्षता इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात असे शैक्षणिक प्रगतीत शिक्षण हा महत्वाचा घटक असल्याने या शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्र सुरु केले. सहा महिन्यांच्या प्रशिक्षण काळात वीस शिक्षकाना अंकगणित,भाषा, शालेय व्यवस्था, अध्यापन पध्दती इत्यादी विषयांचे शिक्षण दिले जात होते. तांत्रिक शिक्षणांची समाजात आवड निर्माण व्हावी म्हणून जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिटयूटची स्थापना केली. या संस्थेत विद्यार्थ्यांना लोहारकाम, गंवडीकाम, सुतारकाम यासारख्या विषयांचे शिक्षण दिले जाई. विद्यार्थ्यांना लष्करी जीवनाविषयी आवड निर्माण व्हावी म्हणून लष्करी शिक्षण देणारे इन्फंट्री स्कूल सुरु केले. विद्यार्थ्यांमध्ये व्यायाम व लष्करी शिक्षणाची आवड निर्माण केली. या विविध शिक्षण संस्थांच्याव्दारे बहुजन समाजाला विविधांगी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करुन देण्याचे श्रेण छत्रपती शाहू महाराजांना द्यावे लागते.

**६. विद्यार्थी वसतिगृहांची निर्मिती :-** माध्यमिक, तांत्रिक किंवा उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असूनही खेडयापाड्यांतील अनेक विद्यार्थ्यांना या संधीचा फायदा घेता येत नाही, हे महाराजांना जाणवले. शहरात त्यांच्या राहण्या व जेवण्याची सोय होत नाही. शिवाय गरिबी व काही वेळा त्यांची जात या गोष्टींमुळे अडचणी निर्माण होतात हे त्यांच्या लक्षात आले. ही समस्या दूर करण्यासाठी कोल्हापुरात विद्यार्थी वसतीगृहाची निर्मिती करण्याचे धारेण त्यांनी आखले. इ.स.१८९६ मध्ये कोल्हापुरात सर्व जातीजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी एक वसतीगृह सुरु केले. विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची तेथे मोफत सोय केली, तथापि या वसतीगृहात तीन वर्षाच्या काळात केवळ ब्राम्हण विद्यार्थ्यांनच समाविष्ट केले गेले हे लक्षात आल्यानंतर शाहू महाराजंनी कोल्हापूरात निरनिराळ्या जातीच्या विद्यार्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे काढण्याचा निर्णय घेतला. थोड्याच काळांत कोल्हापूरमध्ये व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, दिगंबर जैन बोर्डिंग, वीरशैव लिंगायत विद्यार्थीवसतीगृह, मुस्लिम बोर्डिंग, श्री नामदेव बोर्डिंग, पांचाल ब्राम्हण वसतिगृह, इंडियन ख्रिश्चन होस्टेल, वैश्य बोर्डिंग, ढोर-चांभार बोर्डिंग, सुतार बोर्डिंग, नाभिक वसतीगृह, रावबहादूर सबनीस प्रभू बोर्डिंग इत्यादी निरनिराळ्या जातींची सुमारे वीस वसतिगृहे निर्माण झाली. या वसतीगृहामंधून विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था केली जात असे.

विविध वसतीगृहामध्यें विद्यार्थ्यांसाठी निरनिराळ्या सोयी केलेल्या असून त्यांना घरापेक्षा

Scanned with OKEN Scanner

समानता ...
योग्य फळे त्यांना दिसू लागली. महाराजांच्या धोरणामुळेच शिक्षणाची संधी लाभलेल्या कर्मचवीर डॉ. भाऊराव पाटील, श्री, भाऊसाहेब हिरे, डॉ. पंजाबराव देशमुख, श्री. बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाला शिक्षित व जागृत बनविण्याचे महाराजांचे कार्य पुढी चोलविले. या प्रेरणेतच शाहू महाराजंच्या शैक्षणिक कार्याचे खेर यश दिसते.

**७) महाराजांचे सामाजिक सुधारणेचे कार्य :-** छत्रपती शाहू महाराजांच्या अगोदर सामाजिक जीवनात जातीव्यवस्थेचे प्राबल्य होते. जातीभेदाच्या परंपरेमुळे भारतीय समाजात राजकीय किंवा सामाजिक जीवनात एकता अस्तित्वात नव्हती. समाजात उच्च मानल्या गेलेल्या जातींनी परंपरेच्या आधारे व धार्मिक बंधनाच्याव्दारे कनिष्ठ जातींवर अनेक बंधने लादली. होती. या जातीभेदामुळे समाजातील व्यक्तीं माणुस म्हणून असलेले अधिकारही मिळत नव्हते. त्यामुळेच राष्ट्रीय व सामाजिक एक्य नष्ट करणारा हा जातीभेद हेच जाती मत्सराचे मुळ असल्याने सर्व जाती नष्ट करून समाज एकजिनसी बनविण्याचे त्याचे धोरण होते. महाराष्ट्रात या अगोदरच राजकीय वा सामाजिक सुधारणा याविषयी वाद निर्माण झाला होता. सामाजिक सुधारण नंतर करता येतील पण प्रथम स्वातंत्र्य मिळविले पाहिजे असा लोकमान्य टिळकांचा आग्रह होता. शाहु महाराजांच्या मते हा वादच मूलत: चुकीचा होता. कारण, या दोन्ही सुधारणा एकच असून समाज जीवनाच्या रथाची ही दोन चाके आहेत. त्यांच्या मते ब्रिटशांच्या वर्चस्वाविरुध्द यशस्वी स्वातंत्र्यचळवळ करण्यासाठी सर्व जातींना विश्वासात घेणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यात सर्व लोकांना नागरिक म्हणून समाज पातळीवर अधिकार मिळतील हे सांगणे आवश्यक आहे. तथापि, त्या काळात धर्मधिष्ठित जातीसंस्थेच्या प्रभावाखाली असलेल्या नेत्यांनी हा दृष्टीकोन न स्वीकारल्याने शाहू महाराजांनी या जातीभेदाविरुध्द खंबीरपणे उभे राहण्याचे ठरविले. जातीभेदाची कालबाह्यता व सामाजविघातकता उच्चर्णियांनी युक्तीवादाने पटवून देऊन त्यांच मतपरिर्वतन करणेची रानडे व आगरकारांची खटपट होती. तथापि. भारतातील वरिष्ठ जातीतील लोकांना प्रतिष्ठा व विशेषाधिकार हे जन्मसिध्द असल्याने ते जातीव्यवस्थेला नष्ट करण्यासाइी आपणाहून पुढे येण्याचा संभव नव्हता त्यामुळेच जातीसंस्थेतील अन्याय व विषता यांचा जाच ज्यांना पिढ्यानपिढ्या सहन करावा लागला, त्या शुद्रतिशुद्रांनी स्वत:च्या हक्कांसाठी प्रस्थापितांविरूध्द खंबीरपणे संघर्ष करण्याचा विचार महात्मा फुले यांच्याकडे मांडला होता. तथापि, न्या. रानडे यांच्या विचार व कार्यपध्दतीतील नेमस्तपणा महाराजांना मनवणारा नव्हता. तसेच पूर्वपंरपरेच्या मुळावरच घाव घालून सामाजिक जीवनातील सातत्य नष्ट करणारा फुले यांचा संघर्षवाद न्या. रानडे यांची परंपरानिष्ठ समन्वशील

Scanned with OKEN Scanner

करून समाजाभिमुख धोरणाचा स्वीकार केलेला होता. सनातनी प्रवृतीचा स्वीकार करून समाजातील आपले स्थान टिकविण्याचा प्रयत्न करणाऱ्या ब्राम्हणांना हे मान्य होण्याजोगे नव्हते. महाराजांचे धोरण सामाजिक समता व देशोन्तीस उपयुक्त असले तरी, अज्ञानी व अंधश्रध्दाळू समाजावर निरनिराळी बंधने ठेवून आपले वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्या ब्राह्मणांच्या प्रवृत्तीला हे धोरण मान्य होणारे नव्हते.. अधिकारग्रहण केल्यानंतर महाराजांना जाणवले की संस्थानच्या राज्यकारभारात ब्राह्मण किंवा उच्च जातीच्या व्यक्तींचेच प्रमाण अधिक आहे. बहुजन समाजाचे प्रमाण अतिशय अल्प आहे. त्यामुळे इ.स.१८९४ पासूनच त्यांनी अब्राम्हणांना नोकऱ्या देण्यास सुरुवात केली. अब्राम्हणाला प्रतिष्ठेची नोकरी म्हणजे आपले आर्थिक नुकसान व सामाजिक अवमूल्यन होय अशी ब्राम्हणांची धारणा बनली. म्हणूनच या वर्गाने महाराजांच्या सामाजिक समता निर्माण करण्याचा प्रयत्नांना विरोध केला.

इ.स. १८९९ मध्ये छत्रपती शाहु महाराज आपली नित्य पूजाअर्चा करीत असताना त्यांचा पुरोहित नारायण भट वेदोक्त मंत्राऐवजी पुराणोक्त मंत्र म्हणत असल्याचे महाराजांना समजल. याबद्दल त्यांनी पुरोहिताला खुलासा विचारला. पुरोहिताने सांगितले की, महाराज हे क्षतिय नसल्याने त्यांना वैदिक पध्दतीच्या मंत्राचा अधिकार नाही. म्हूणन शूद्रांसाठी असललेले मंत्र आपण म्हणतो. पुरोहिताच्या वरील स्पष्टीकरणाने महाराजांना या ब्राम्हणी प्रवृत्तींची खरी कल्पना आली. प्रत्यक्ष राजाबरोरब असे वर्तन करणाऱ्या या भिक्षुकांचे सर्वसामान्य समाजाबरोबर किती कठोर वर्त असेल याची जाणीव झाली. त्यामुळेच त्यांनी या भिक्षुकशाही बरोबर संघर्ष करण्यचा निश्चय केला. मध्ययुगीन काळात कलियुग अवतरले व सर्व क्षत्रिय नष्ट झाले. केवळ ब्राम्हण व शुद्र या दोनच जाती अस्तित्वात आहेत असे भासविण्यात ब्राम्हण धर्ममार्तंड यशस्वी झाले होते. हा वाद जुनाच होता. छत्रपती शिवाजी महाराजांनाही त्याचा त्रास सहन करावा लागला. शाहू महाराजांवरही ही पाळी आली. मात्र त्यांनी ब्राम्हणांच्या या प्रवृत्तीला प्रखर विरोध केला व अतिशय धीरोदत्तपणे हा संघर्ष चालविला.

राजर्षी शाहू महाराजांनी इ.स. १९०१ मध्ये वैदिक वाडमय प्रवीण अशा नारायण भट्ट सेवेकरी या ब्राम्हणाकडून वेदोक्ती पध्दतीने श्रावणी केली.त्याचवर्षी त्यांनी आप्पासाहेब राजोपाध्ये याना विधी करण्यासाठी वारंवार कळविले. राजोपाध्यांनी नकार दिला. छत्रपती जरी क्षत्रिय असले तरी महाराज हे कागलच्या घाटगे घराण्यात जन्मलेले असल्यामुळे वेदोक्त विधी करता येत नाही असे त्यांनी मत दिले. लोकमान्य टिळकांनी यावेळी ब्राम्हणांची बाजू घेतली. श्रृंगेरीच्या जगदफॅगुरु शंकराचार्यांनीही हेच मत दिले. केसरी व इतर वृत्पत्रांतून महाराजंवर टीका झाली. तथापि, महाराजांनी माघार घेतली नाही. लोकमान्यांनी तडजोडीचा प्रयत्न केला. शिवछत्रपती क्षत्रिय ठरले होते तर त्यांच्या गादीवर येणार घाटगे घराण्यातील पुरुष असला तरी तो भेसले ठरतो. तेव्हा जो छत्रपतीच्या गादीवर बसेल तोच क्षत्रिय, राजाचा दुसरा बंधू असेल तर तो क्षत्रिय नाही, ही तडजोड महाराजांनी अमान्य केली. महाराष्ट्रातील इतर मराठा घराणी व छत्रपती यांच्यात दरी निर्माण करणारा विचार त्यांनी स्वीकारला नाही.

Scanned with OKEN Scanner

इ.स.१९१९ मध्ये काढलेल्या एका हुकमानुसार कोणत्याही शिक्षकांनी शाळेत अस्पृश्यांच्या मुलांची अस्पृश्यता मानवयाचा नाही, त्यांना इतर मुलांप्रमाणे वागवावे, समान वागणूक द्यावी अशी आज्ञा दिली. अस्पृश्यांमध्ये शैक्षणिक प्रसार झाला व जातीला शिक्षणाचे महत्त्व समजले म्हणजे त्यांच्या उन्नतीस खरी सुरवात होईल असे महाराजंचे धोरण होते.

**१. अस्पृश्यता निवारण :-** अस्पृश्यता निवारण्याच्या या कार्यायसाठी त्यानी निरनिराळ्या अस्पृश्यांना संस्थानच्या नोकरीत सामावून घेण्यास, त्यांना प्रगतीची संधी देण्यास व सामाजिक प्रतिष्ठा देण्यास सुरुवात केली. त्यांना महार समाजातील काहीना माहूत म्हणून सरकारी कामावर घेतले. आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या विवाह सोहळयाच्यावेळी काहीना वरातीत सरकारी घोडागाडीवर कोचमन म्हणून बसविले. महारांमधील कमीपणा स्वीकारुन लाचारीने वागण्याची पध्दत बंद व्हावी म्हणून त्यांनी बलुतेदाराची व वेठबिगारीची पध्दत कायद्याने बंद केली. अस्पृश्यांना शिवणयंत्रे देऊन स्वतंत्र धंदा करण्यास प्रोत्साहन दिले. राजवाड्यातील कपडे त्यांच्याकंडून शिवून घेण्यास सुरुवात केली. गंगाधर कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापुरात चहाचे दुकान काढून दिले. स्वत: महाराज तेथे जाऊन सर्वांसमोर चहा घेत असत. महार कोचमन असलेल्या आपल्या घोडागाडीत ते जहागिरदारांना मुद्दाम बसवीत असत. अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त व्हावी म्हणून त्यांनी महार पैलवानांना जाठ पैलवान, चांभारांना सरदार, तर भंग्यांना पंडित अश्या पदव्या दिल्या. बेरड, पारधी रामोशी यांसारख्या गुन्हेगार म्हणून ओळखल्या गेलेल्या जातींतील लोकांबरोबर मैत्री केली. त्यांना संस्थानात नोकरीत घेतले. अस्पृश्य शिक्षित तरुणांची तलाठी म्हणून नेमणूक केली. त्यामुळेच खेड्यातून पाटलांच्या बरोबरीने बसण्याचा त्यांना मान मिळाला. त्यांनी स्वतंत्र हुकमाच्या आधारे कचरेया, म्युनिसिपालिटी, तळे, विहिरी, धर्मशाळा येथे अस्पृश्यांना स्पर्श्यांप्रमाणेच राहण्याचा व उपभोग घेण्याचा अधिकार दिला. योग्य शिक्षण झालेल्या अस्पृश्य तरुणांना छत्रपती शाहू महाराजांनी वकिलीच्या सदना दिल्या. त्याकाळाच्या दृष्टीकोनातून महाराजांच्या या निर्णयाकडे पाहिल्यास त्यांच्या क्रांतिकारक प्रवृत्तीचे व कार्यामागील तीव्र जणिवेचे दर्शन होते. अस्पृश्योध्दारासाठी या जातीजमातींना ज्या सोयी -सवलती दिलेल्या होत्या त्यांच्या संदर्भात त्यांनी कडक कायदे केले. इ.स.१९१९ मध्ये बलुतेदरी पध्दत बंद करण्याविषयीच्या कायद्याचा भंग करणाऱ्याला त्यांनी १०० रु दंड व चार दिवसांची कारावासाची शिक्षणा देणारा कायदा केला. इ.स.१९१८ साली काढलेल्या एका हुकमानुसार गुन्हेगार जमातीच्या लोकांना रोज पोलीस चौकीवर हजेरी देण्याची पध्दत बंद केली. अस्पृश्य

Scanned with OKEN Scanner